स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, विष्णुपुरी, नांदेड

निवड प्रक्रियेच्या मान्यतेसाठी — चेक लिस्ट

**प्राचार्य, सहाय्यक प्राध्यापक, ग्रंथपाल आणि संचालक शारीरिक शिक्षण व क्रीडा यांच्या निवड प्रक्रियेच्या अहवालास मान्यतेचा प्रस्ताव विद्यापीठात पाठविताना त्यासोबत आवश्यक कागदपत्रांची जोडावयाची यादी**

**प्राचार्य पदाच्या निवड प्रक्रियेचा अहवाल (अध्यक्ष/सचिव यांच्या सहीनेच पत्रव्यवहार करावा) प्रस्तावासोबत खालीलप्रमाणे नमुद केलेल्या बाबी आवश्यक आहेत.**

१. मा.शिक्षण संचालक व सहसंचालक कार्यालयाने प्राचार्य पद भरण्यास नाहरकत दिलेले पत्र व सहसंचालक कार्यालयाचे पदमान्यता पत्र.

२. जाहीरात मसुद्यास प्रस्तुत विद्यापीठाच्या विशेष कक्ष विभागाने मान्यता दिलेले पत्र व जाहीरात मसुदा.

३. जाहीरातीचे कात्रण राज्य, राष्ट्रीय व विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द केल्याचा पुरावा.

४. छाननी समितीचा अहवाल (Scrutiny Committee Report) (मुळप्रत)

५. उमेदवारांना व विद्यापीठ निवड समिती सदस्यांना मुलाखतीसाठी उपस्थित राहणेकरीता केलेला पत्रव्यवहाराच्या प्रती.

६. मुलाखत पत्र पंजीकृत पोहच पोस्टाने (Registered A.D.) पाठविलेल्या पोस्टाच्या पावतीच्या छायांकीत प्रती.

७. मुलाखती करीता उपस्थित उमेदवारांची स्वाक्षरीसह उपस्थिती यादी. (मुळप्रत)

८. उपस्थित उमेदवारांना समितीने विहित नमुन्यात गुणदान केलेला गुणदान तक्ता (मुळप्रत) (UGC Regulation 2018) नूसार.

९. विद्यापीठ निवड समितीचा अहवाल (मुळप्रत) (UGC Regulation 2018) नूसार.

१०. निवड झालेल्या उमेदवाराचे दहावी, पदवी, पदव्युत्तर, नेट, सेट व पीएच्.डी. प्रमाणपत्र, नोटीफिकेशन व स्क्रिण्ड पीएच.डी. प्रमाणपत्रासह.

११. निवड झालेल्या उमेदवाराचे पुर्वीच्या महाविद्यालयाच्या प्रशासनाने सदर पदास अर्ज करण्याकरीता नाहरकत दिलेले पत्र.

१२. अधिव्याख्याता म्हणून १५ वर्षापेक्षा जास्त अनुभव असल्याचे प्रमाणपत्र.

१३. सहयोगी प्राध्यापक / प्राध्यापक म्हणून पदोन्नतीस विद्यापीठाने मान्यता दिलेल्या पत्राची प्रत.

१४. अधिव्याख्याता पदावरील नियुक्तीस विद्यापीठाने मान्यता दिलेले पत्र.

१५. दोनही मा.कुलगुरू प्रतिनिधी यांचा अहवाल स्वतंत्रपणे विद्यापीठात सादर करणे आवश्यक.

१६. सदर प्राचार्य पदाबाबत मा.न्यायालयीन किंवा काही वाद प्रकरण प्रलंबित नसल्याचे संस्थेचे हमीपत्र.

१७. निवड झालेल्या उमेदवाराचे जन्म तारखेचा पुरावा.

----------oOo---------

**विद्यापीठाने प्राचार्य पदाच्या निवड प्रक्रियेस मान्यता दिल्यानंतर संबंधितांचे खालीलप्रमाणे नमुद केलेले कागदपत्र अंतिम मान्यतेसाठी सादर करावे (अध्यक्ष/सचिव यांच्या सहीनेच पत्रव्यवहार करावा).**

१. विद्यापीठाने निवड प्रक्रियेस मान्यता दिलेल्या पत्राची छायांकीत प्रत.

२. संस्थेने विहित नमुन्यात दिलेले नियुक्ती आदेश. सदर आदेशात प्राचार्य पदाचा कार्यकाळ (Tenure) चा उल्लेख यु.जी.सी.विनियमातील तरतुदीनुसार करावा (विद्यापीठ परिनियमातील नमुन्या मध्येच नेमणूक आदेश असावा)

३. रूजू अहवाल (अध्यक्ष किंवा सचिवांनी रूजू करून घेतल्याच्या नोंदीसह).

४. Deed of Contract of Service (विद्यापीठ परिनियमात नमुद नमुन्यानुसार)

५. नियुक्त झालेल्या प्राचार्याचे मागील महिन्यातील पगारपत्रक (Last Pay Slip)

----------oOo---------

मागे पहा...२..

**सहाय्यक प्राध्यापक पदाच्या निवड प्रक्रियेचा अहवाल (अध्यक्ष/सचिव/प्राचार्य यांच्या सहीनेच पत्रव्यवहार करावा) प्रस्तावासोबत खालीलप्रमाणे नमुद केलेल्या बाबी आवश्यक आहेत.**

१. एकूण किती सहाय्यक प्राध्यापकांना मान्यता हवी त्यांची नांवे मुख्य लेटरपॅडवर नमुद करावी. शेरा कॉलम मध्ये पुर्णवेळ याचा स्पष्ट उल्लेख करावा.

२. एकूण किती पदासाठी विद्यापीठ निवड समिती दिली होती व किती पदासाठी निवड झाली आहे याचे सविस्तर विवरण/माहिती सादर करावी.

३. मा.शिक्षण संचालक / सहसंचालक कार्यालयाने सहाय्यक प्राध्यापक पद भरण्यास नाहरकत दिलेले पत्र व सहसंचालक कार्यालयाचे पदमान्यता पत्र.

४. जाहीरात मसुद्यास प्रस्तुत विद्यापीठाच्या विशेष कक्ष विभागाने मान्यता दिलेले पत्र व जाहीरात मसुदा.

५. जाहीरातीचे कात्रण राज्य, राष्ट्रीय व विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द केल्याचा पुरावा.
६. मागासवर्गीय पदासाठी विद्यापीठाच्या विशेष कक्षास व सर्व संबंधीत मागासवर्गीय कार्यालयास पत्रव्यवहार केलेल्या पत्राची छायांकीत प्रती.
७. छाननी समितीचा अहवाल (Scrutiny Committee Report) (मुळप्रत)

८. उमेदवारांना व विद्यापीठ निवड समिती सदस्यांना मुलाखतीसाठी उपस्थित राहणेकरीता केलेला पत्रव्यवहाराच्या प्रती.

९. मुलाखत पत्र पंजीकृत पोहच पोस्टाने (Registered A.D.) पाठविलेल्या पोस्टाच्या पावतीच्या छायांकीत प्रती.
१०. मुलाखती करीता उपस्थित उमेदवारांची स्वाक्षरीसह उपस्थिती यादी. (मुळप्रत)

११. उपस्थित उमेदवारांना समितीने विहित नमुन्यात गुणदान केलेला गुणदान तक्ता (मुळप्रत) (UGC Regulation 2018) नूसार.

१२. विद्यापीठ निवड समितीचा अहवाल (जाहीरातीतील प्रवर्ग व उमेदवाराचा प्रवर्ग स्पष्ट नमूद करावा) (मुळप्रत) (UGC Regulation 2018) नूसार.

१३. निवड झालेल्या उमेदवारांचे पदवी, पदव्युत्तर, नेट, सेट व पीएच्.डी. प्रमाणपत्र, नोटीफिकेशन व स्क्रिण्ड पीएच.डी. प्रमाणपत्राच्या साक्षांकित छायाप्रती. (वाचता येईल अशा प्रती)

१४. राखीव प्रवर्गावर निवड झालेल्या उमेदवारांचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राच्या साक्षांकित छायाप्रत.
१५. आरक्षीत पदासाठी मागासवर्गीय पात्र उमेदवारांच्या उपलब्धतेसाठी मागासवर्गीय कार्यालयास पत्रव्यवहार केल्याचे पुरावे व प्राप्त यादी.

१६. महाविद्यालयाची १०० बिंदू नामावली पद भरती केलेल्या शिक्षकांच्या प्रवर्ग निहाय माहिती व मावक ने मान्यता दिलेल्या पत्राची प्रत.

१७. सदर पदाबाबत कोणताही वाद अथवा मा.न्यायालयीन प्रकरण प्रलंबित नसल्याबाबत संस्था अध्यक्ष/सचिव व प्राचार्य यांचे संयुक्त हमीपत्र.

१८. निवड झालेल्या उमेदवाराचे जन्म तारखेचा पुरावा.

१९. बिंदुनामावली पदांच्या गोषवाऱ्यासह विहित नमुन्यातील यादी. (एकूण मंजुर पदे, कार्यरत पदे व भरावयाच्या पदासह माहिती सादर करावी)

२०. दोनही मा.कुलगुरू प्रतिनिधी यांनी त्यांचा अहवाल स्वतंत्रपणे विद्यापीठात सादर करणे आवश्यक. उपरोक्त चेकलिस्ट नूसार प्रस्ताव पाठवीत असतांना, सोबत जोडलेल्या कागदपत्राची यादी करून अनुक्रमणिका व पृष्ठक्रमांकासह पाठवावी, अपुर्ण तथा त्रुटी असलेले प्रस्ताव पाठवू नये.

----------oOo---------

**विद्यापीठाने सहाय्यक प्राध्यापकांच्या निवड प्रक्रियेस मान्यता दिल्यानंतर संबंधितांचे खालीलप्रमाणे नमुद केलेले कागदपत्र अंतिम मान्यतेसाठी सादर करावे (अध्यक्ष/सचिव/प्राचार्य यांच्या सहीनेच पत्रव्यवहार करावा)**
१. विद्यापीठाने निवड प्रक्रियेस मान्यता दिलेल्या पत्राची छायांकीत प्रत.
२. संस्थेने/प्राचार्यांनी संबंधित अध्यापकास विहित नमुन्यात दिलेले नियुक्ती आदेश. (विद्यापीठ परिनियमातील नमुन्या मध्येच नेमणूक आदेश असावा)
३. रूजू अहवाल (अध्यक्ष, सचिव किंवा प्राचार्यांनी रूजू करून घेतल्याच्या नोंदीसह).
४. Deed of Contract of Service (विद्यापीठ परिनियमात नमुद नमुन्यानुसार)

----------oOo---------